# ११ . उंट . Camel.

एका शहरातल्या प्राणिसंग्रहालयात मध्ये एक उंट व त्याचे पिल्लू असते . एक दिवस उंटाचे पिल्लू आईला म्हणते की मला तूला काही प्रश्न विचारायचेत . आई ( उंट ) आश्र्चर्यचकीत होते व म्हणते विचार की .

पिल्लू विचारते की आपल्या पाठीवर हा उंचवटा का ? (याला वशिंड म्हणतात) उंट म्हणतो की आपण वाळवंटात असल्यामुळे आपले पाणी व खाणे याच्यात साठविलेले असते . डोळयावर जाड पडदा का ? पिल्लू परत विचारते की आपले पाय उंच का ? आई सांगते की आपल्याला वाळवंटात त्यामुळे व्यवस्थित चालता येते . पिल्लू विचार करू लागते आणि पटकन विचारते की मग आई तू व मी वाळवंटात असायला पाहिजे होतो .आपण येथे प्राणिसंग्रहालयात काय करतोय ?

काय मित्रांनो पिल्लाने बिनतोड प्रश्न विचारला ना ? उंटाचे बोलणे मला कसे समजले हा मुद्दा क्षणभर बाजूला ठेवूया व पिल्लाच्या प्रश्नाकडे वळूया .

आपल्याला लक्षात येईल की आपले शिक्षण अनुभव यांचा जर ते योग्य ठिकाणी असेल तरच योग्य उपयोग होईल . आपण जर का डोळसपणे बघितले तर अशी कितीतरी उदाहरणे दिसतील की माणूस शिकतो एक व नोकरी / कामधंदा दुस-याच क्षेत्रातील करतो . आज नाटयसृष्टीवर नजर टाकली तर असे दिसेल कि कितीतरी डॉक्टर मंडळी वैद्यकिय शिक्षण घेऊन प्रथित यश नट झाले आहेत . उदा . काशिनाथ घाणेकर , गिरीष ओक , श्रीराम लागू .

माझ्या स्वतःच्या माहितीत काही डॉक्टर व्यवसाय करत आहेत . काही मुले हौशीने प्रॉडक्शन इंजिनिअर होतात . पण मग शॉप फ्लोअर वर काम करायला नाखूष असतात . कारण कामगारांकडून काम करून घेणे सर्वांनाच जमेल असे नाही . पण हा विचार शिक्षण निवडताना केला जात नाही .

एखादा मुलगा केमिकल इंजिनिअर घेतो पण नोकरी जमत नाही . कारण लहानपणापासून त्याला दम्याचा त्रास असतो व कारखान्यातील वास त्याला सहन होत नाहीत .

एखादा तरूण शिक्षण पूर्ण झाल्यावर चांगली नोकरी मिळत नाही म्हणून शिक्षकाचा पेशा स्वीकारतो पण मुलांचा आवडता शिक्षक होऊ शकत नाही कारण हा पेशा त्याने नाईलाजाने घेतलेला असतो .

फॅशन परेड च्या जगात वावरणारी एक विवाहीत मॉडेल तर डॉक्टर आहे .

हल्लीच्या स्पर्धेच्या जगात कमी शिकलेल्या ( पदविधर फक्त ) मुला मुलींना पोटासाठी मिळेल ते काम करावे लागते . पण एक वेळ हे समजण्यासारखे आहे . पण उच्च शिक्षण घेताना आपल्या मनाचा , आवडीचा, शरीर क्षमतेचा कल विचारात घेणे गरजेचे आहे . असे केले तरच आपण घेतलेल्या परिश्रमाचे , सरकारने दिलेल्या सुविधेचे व समाजाचे चीज होईल असे मला वाटते .

मित्रांनो तुमच्या पाहण्यात अशी काही मंडळी असतीलच . हा लेख वाचल्यावर परत एकदा निरखून पहा त्यांच्याकडे .